

श्रीमहाराज विरचित

# ॥ श्रीराम पाठ ॥

ॐ नमो जी सद्‌गुरूनाथा । तुझे चरणी ठेविला माथा ।
पूर्ण करी मनोरथा । विनंति माझी परिसावी ॥१॥

रामपाठाचा उच्चार । मम हृदयी करी उद्‌धार ।
हेचि मागणे वारंवार । तुजलागी दयाळा ॥२॥

व्यास वाल्मीकी नारदमुनि । शुकसनकादिक ज्याचे ध्यानी ।
तो श्रीराम चापपाणि । मम वाणी वदो का ॥३॥

अयोध्यावासी नगरजन । रामासी भजती अनुदिन ।
तो कौसल्यानंदन । मम हृदयी वसावा ॥४॥

सद्‌गुरू म्हणे ऊठ लवलाही । ज्ञानदीपाचे प्रकाशे पाही ।
वस्तू आपली शोधूनी घेई । मग पावशी निजसुखा ॥५॥

सद्‌गुरू राजवैद्य पूर्ण । रामनामाचे रसायन ।
स्वहस्ते मम मुखी पाजून । केले सावध स्वरूपी ॥६॥

नेत्री घातले बोधांजन । भवरोग काढिला मुळीहून ।
मूर्ती दाविली सगुण । ते रूप वर्णिले न जाय ॥७॥

चतुर्भुज मेघश्याम सांवळा । कांसे पीतांबर पिवळा ।
गळा वैजयंतीमाळा । मुक्ताहार डोलती ॥८॥

अंगी चंदनाची उटी । केशर कस्तुरी लल्लाटी ।
अमूल्य रत्ने शोभती मुकुटी । कर्णी कुंडले तळपती ॥९॥

क्षुद्रघंटा वाजती कटी । दशांगुली मुद्रिकांची दाटी ।
बाहुभूषणे शोभती मनगटी । सुवर्णपादुका चरणकमली ॥१०॥

शंख चक्र चाप बाण । वरद हस्त उदार वदन ।
विशाळ भाळ आकर्ण नयन । ऐसा भगवान देखिला ॥११॥

गुप्त ठेविले निर्गुण प्रकट केले स्वरूप सगुण ।
श्रीराम अवतार घेऊन । धर्म स्थापिला स्वहस्ते ॥१२॥

अयोध्या पुण्यपावन नगरी । तेथे श्रीराम राज्य करी ।
तपोनिधि महाक्षत्री । सिंहासनीं विराजे ॥१३॥

शेषे धरिले छत्र । भरतशत्रुघ्न धरिती चामर ।
भक्त प्रार्थिती वारंवार । जयजयकारे गर्जती ॥१४॥

नळ नीळ जाम्बुवंत । अंगद सुग्रीव बिभीषण भक्त ।
निरिच्छ वायुसुत । सदा निमग्न रामरूपी ॥१५॥

वसिष्ठ विश्वामित्र ऋषि । दत्त दिगंबर तापसी ।
ब्रह्मचारी कित्येक संन्यासी । रामनामी लुब्धले ॥१६॥

रामनाम हृदयी धरून । ध्यानी बैसले योगीजन ।
यम इंद्र अग्नि वरुण । पंचवदन तप करी ॥१७॥

रामनामाची अपरिमित शक्ती । शेषाची वर्णितां खुंटली मति ।
वेदाची न चले गति । शास्त्रे लज्जित बैसली ॥१८॥

अनंत अवतारांचा महिमा तोही रामनामी तुळेना ।
ऐशिया रामाच्या सद्गुणा । मी मानव काय वर्णू ॥१९॥

रामी रंगले त्रिभुवन । जडमूढ काष्ठ पाषाण ।
घटमठात सर्वांत परिपूर्ण । त्याहून वेगळा राहिला ॥२०॥

पिंडब्रह्मांडाची रचना । तू निर्मिली रघुनंदना ।
जगव्यापका आत्मारामा । शोधिता ठायी न पडे कोठे ॥२१॥

तुझे स्वरूपाची व्हावी प्राप्ती । यालागी कित्येक तप करिती ।
कित्येक पंचाग्निधूम्रपान साधिती । तयासी अंत न लागे तुझा ॥२२॥

तेथे मी अज्ञान मूढमति । करू नेणे तुझी भक्ती ।
परि संतमुखे ऐकिली कीर्ती । शरणागता उद्‌धरी तू ॥२३॥

माझ्या भाग्यासी नाही मिती । तूं भेटलासी जगज्योति ।
आता कळेल तैशा रीती । उद्‌धारगती करी माझी ॥२४॥

तुझे ब्रीदाचे महिमान । कित्येक उद्‌धरिले पापीजन ।
विरोधभक्तीने रावण । वैकुंठपदी पावविला ॥२५॥

सात्त्विक भक्त थोर थोर । तुलसीदास कमाल कबीर ।
रामदास वायुकुमर । त्यांचा किंकर मज करी ॥२६॥

मी न मागे धनसंपत्ती । मज न लागे वैकुंठप्राप्ती ।
परी तुझ्या भक्तांची संगती । मज घडो सर्वदा ॥२७॥

कोट्यानुकोटी जन्म घेईन । करीन तुझे पादसेवन ।
अवतारलीला मुखाने गाईन । ऐसे मज देई सर्वथा ॥२८॥

तुझ्या अवतारलीला बहुत । व्यास बोलिले संस्कृत ।
ते अज्ञानासी न होय प्राप्त । यास्तव प्राकृत वर्णिले ॥२९॥

सद्‌गुरूने निर्मिला हा ग्रंथ । रामपाठ केवळ अमृत ।
श्रवणद्‌वारे पाजूनी यथार्थ । तृप्त केले भक्तजन ॥३०॥

ज्यासी वैकुंठपदाची गोडी । त्याने रामपाठ भजावा आवडी ।
त्याचे संकटी घालूनी उडी । श्रीराम रक्षी निजांगे ॥३१॥

ज्ञानदेव करी हरिपाठ । ब्रह्मचैतन्य करी रामपाठ ।
भक्तजनी मानावे दोन्ही श्रेष्ठ । ग्रंथ वरिष्ठ प्रभूचा ॥३२॥

मज काही ज्ञान नसे किंचित् । हृदयी प्रकटला जानकीकांत ।
त्याचा त्याने लिहून ग्रंथ । भक्तासी अर्पिला प्रीतीने ॥३३॥

॥ जानकीजीवनस्मरण जय जय राम ॥